# धनलक्ष्मी शिक्षण संस्था
## एस.एस.के.कला आणि वाणिज्य महाविद्यालय
## नायगाव
## ता.सिन्नर जि.नाशिक

**<u>सुचना</u>**

**दिनांक** –२०/०२/२०२५

**सॉफ्ट स्कील, सेल्स अ‍ॅण्ड मार्केटिंग ट्रेनिंग प्रोग्राम सेमिनार कार्यक्रम**

सर्व विद्यार्थांना कळविण्यात येते की, वाणिज्य विभागांतर्गत आपल्या महाविद्यालयात २५/०२/२०२५ रोजी वाणिज्य विभागांतर्गत सॉफ्ट स्कील, सेल्स अ‍ॅण्ड मार्केटिंग ट्रेनिंग प्रोग्राम सेमिनार कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

तरी सर्व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

Sahakarmitra Shivajirao Katkade Arts and Commerce College
Wadzire

Principal
Sahakarmitra Shivajirao Katkade
Arts & Commerce College,
Naigaon, Tal.Sinnar (Nasik)

# धनलक्ष्मी शिक्षण संस्था
# एस.एस.के.कला आणि वाणिज्य महाविद्यालय
# नायगाव
# ता.सिन्नर जि.नाशिक

धनलक्ष्मी शिक्षण संस्था संचालित, सहकारमित्र शिवाजीराव कातकाडे कला व वाणिज्य महाविद्यालय, नायगाव सिन्नर,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने व वाणिज्य विभागांतर्गत सॉफ्ट स्कील, सेल्स ॲण्ड मार्केटिंग ट्रेनिंग प्रोग्राम सेमिनार कार्यक्रम संपन्न झाला.

**दिनांक - २५ फेब्रुवारी २०२५**

**वेळ** - सकाळी १०: ०० वाजता

**स्थळ** - एस.एस. के. महाविद्यालय नायगाव.

**कार्यक्रमाचे अध्यक्ष** - मा.श्री. कुणाल कातकाडे सर (धनलक्ष्मी शिक्षण संस्था सरचिटणीस)

प्राचार्य - डॉ. के. टी. खैरनार सर

वाणिज्य विभागप्रमुख - प्रा.जी. एन. वाघले सर

एस.एस.के.महाविद्यालयात सॉफ्ट स्कील, सेल्स अ‍ॅण्ड मार्केटिंग ट्रेनिंग प्रोग्राम सेमिनार

दिनांक : २५ फेब्रुवारी २०२५

धनलक्ष्मी शिक्षण संस्थेचे सहकारमित्र शिवाजीराव कातकाडे कला, वाणिज्य महाविद्यालयात वाणिज्य विभागातर्फे सॉफ्ट स्कील, सेल्स अ‍ॅण्ड मार्केटींग ट्रेनिंग प्रोग्राम सेमिनार आयोजित करण्यात आले होता. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून वायफोरडी फाउंडेशनचे अमोल भोळे, रवींद्र राठोड, धनलक्ष्मी शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ कुणाल कातकाडे सर, तसेच संस्थेच्या संचालिका प्रा.उज्वला कातकाडे मॅडम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.टी.खैरनार आदी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना सॉफ्ट स्कील, सेल्स व मार्केटिंग या विषयावर मार्गदर्शन करताना अमोल भोळे यांनी डिजिटल मार्केटिंग, सेल्स टेक्निक, ऑनलाइन मार्केटिंग सॉफ्ट स्किल याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. संस्थेचे सरचिटणीस डॉ.कुणाल कातकाडे सर यांनी विद्यार्थ्यांसाठी राबवलेल्या या उपक्रमाबद्दल महाविद्यालयाचे विशेष कौतुक करून विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सहभागी होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.टी.खैरनार यांनीही विद्यार्थ्यांना भविष्यात स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी या वयातच मार्केटिंग स्किल माहिती करून घेणे फार गरजेचे असल्याचे सांगितले. उपक्रमात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमास

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. भाग्यश्री जेजुरकर यांनी केले, तर आभार प्रा. वाघले सर यांनी मानले.

Sahakarmitra Shivajirao Katkade Arts and Commerce College
Wadzire

Principal
Sahakarmitra Shivajirao Katkade
Arts & Commerce College,
Naigaon, Tal. Sinnar (Nasik)